# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०२/०५/२०२४ (गुरूवार) सकाळ**

---

## पोलीस स्टेशन कुही हददीत दारू विक्रेत्यावर पोलीसांची धडक कारवाई

दि. ०१/०५/२०२४ रोजी पोलीस स्टेशन कुही येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिति मिळाली की, पो.स्टे. कुही हद्दीतील मांढळ वार्ड क्र. ०६ येथे दोन ठिकाणी अवैध्य दारूची विक्री होत असल्याची गोपनिय माहीती कुही पोलीसांना मिळाल्याने पोलीस स्टेशन कुही येथिल अधिकारी व स्टॉफसह वरिष्ठांना माहीती देवुन मा. दिपक अग्रवाल सा. भा.पो.से सहा. पोलीस अधिक्षक तथा ठाणे प्रभारी यांचे नेतृत्वात सदर ठिकाणी जावुन रेड केली असता ०२ इसमांवर कारवाई करण्यात आली. महिला आरोपी हिला घराबाहेर बोलवुन दारू बाबत तिच्या घराची झडती घेतली असता महिला आरोपीचे ताब्यातून १) निळया रंगाच्या कॅन मध्ये १० लिटर प्रमाणे ३० लिटर मोहाफुल गावठी दारू किंमती ३००० रू व १५ निपा देशी दारू किंमती ५२५ रू व कॅन किंमत १५०० रू असा एकुण ५०२५ रू चा माल जप्त करण्यात आला आहे.

तसेच वार्ड क्र. ६ येथील **आरोपी मनोज छन्नुलाल बारसागडे वय ३६ वर्ष** यांच्या घरी गेलो असता सदर ईसम कडी लावुन पळून गेला तेव्हा घरची पाहणी केली असता १५ लिटर मोहाफुल दारू किंमत १५०० रू व कॅन किंमत ५०० रू असा एकुण २००० रू चा माल जप्त करून तपास पो.हवा. सुधिर ज्ञानवोनवार हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, प्रभारी ठाणेदार दिपक अग्रवाल सा. भापोसे सहा पोलीस अधिक्षक पो स्टे कुही यांचे मार्गदर्शनाखाली पोहवा सुधिर ज्ञानबोनवार, म.पो.हवा. सुनिता निखारे, पो. शि. रंजित मेश्राम, पो.शि. अर्जुन नाकतोडे, पो.शि भुमेश्वर भेंडारकर, पो.शि. गणेश बोरूले यांनी यशस्वीपणे पूर्ण केलेली आहे.

# पोलीस स्टेशन कुही हददीत दारू वाहतुक करण्याऱ्यांवर पोलीसांची धडक कारवाई

वृत्त अशा प्रकारे आहे की, पो.स्टे. कुही हद्दीतील निरवा बारवा येथे उमरेड कडुन एक ईसम दारूची वाहतुक करीत आहे अशा गोपनिय माहीती मुखबिरा कडुन मिळाल्याने कुही पोलीसांनी दिनांक ३०/०४/२०२४ रोजी पोलीस स्टेशन कुही येथिल अधिकारी व स्टाफसह वरिष्ठांना माहीती देवुन मा. दिपक अग्रवाल सा. भा.पो.से सहा. पोलीस अधिक्षक तथा ठाणे प्रभारी यांचे नेतृत्वात सदर ठिकाणी जावुन पेट्रोलिंग करीत असता निरवा गावाच्या नाल्याजवळ एक ग्रे रंगाची ॲक्टीव्हा क्र. एम.एच. ४०/ सी.एन. ६२३६ असे दुचाकी वाहन येतानी दिसले त्यास हात ईशा—याने थांबवुन त्यास आपली ओळख देवुन वाहनाची पाहनी केली असता वाहनाच्या पायदानवर एका हिरव्या रंगाच्या थैलीत भिंगरी संत्रा.नं. १ च्या २० निपा व कोकणी देशी दारू संत्रा च्या २० निपा अवैधरित्या वाहतुक करताना मिळुन आल्याने सदर वाहन चालक नामे अमित रमेश वंजारी वय २६ वर्ष रा. बुधवारी पेठ ता. उमरेड जि. नागपुर यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला. कार्यवाहीमध्ये दारू किंमत २८०० रू व ॲक्टीवा वाहन क्र. एम.एच.४०/ सी.एन. ६२३६ किंमत ७००००रू असा एकुन ७२८०० रू चा मुदेमाल जप्त करूण तपास पो.उप.नि. गोपाले सा. हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, प्रभारी ठाणेदार दिपक अग्रवाल सा. भापोसे सहा. पोलीस अधिक्षक पो.स्टे. कुही यांचे मार्गदर्शनाखाली पो.उप.नि. गोपाले, पो.हवा. ओम रेहपाडे, स. फौ. संजय कुलकर्णी, पो. शि. अनिल करडखेले, पो.शि. राहुल देविकर, यांनी यशस्वीपणे पुर्ण केलेली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**